नि.फौ.ख.क्र.३२७४/२२
सरकार वि. मो.जाकीर वगैरे
निशाणी क्र.५०

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ५ यांची शपथेवर सरतपासणी सुरू**

| | | |
|---|---|---|
| मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, | | |
| नाव | – | रत्नमाला प्रकाश पिल्लेवान |
| वय | – | ६५ वर्षे |
| धंदा | – | मजुरी |
| राहणार | – | गडडीगोदाम, नागपूर |

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती संगीता गोगे यांच्याकडून**

१. मी फिर्यादी साजीद कुरेशीला ओळखते. ४–५ वर्षापासुन फिर्यादी आमच्या बाजुला राहतात. त्यांच्याकडे सासु आणि त्याची पत्नी राहत होती. त्याची सासु करोनामध्ये मरण पावली. फिर्यादी आणि आरोपीमध्ये वाद होत होते. त्यांच्यामध्ये फॅनवरुन भांडण झाले, त्याकारणावरुन मारहान झाली. घटनेच्या दिवशी साजीदची बायको, तीची बहीण, तीचा नवरा आणि एक जण फिर्यादीच्या घरी आले. साजीदच्या बायकोला फॅन घेवुन जायचा होता, साजीद फॅन घेवुन जाण्यास नकार देत होता, त्यावरुन त्यांचे भांडण झाले आणि मारपीट झाली. त्यामुळे साजीदचे नाक आणि तोंड फुटले होते त्यामुळे तो तेथुन पळुन गेला. त्यावेळी मी अंगणात बसले होते. त्यानंतर सगळे आरोपी साजीदच्या वडीलांच्या घरी गेले आणि तेथे त्यांनी तोडफोड केली. घटना सन २०२२ रोजीची आहे. आज दोन आरोपी कोर्टात हजर आहेत. त्यांना मी ओळखले. गैरहजर दोन आरोपी समोर आल्यास मी त्यांना ओळखु शकेन.

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री शेख सबाहत** –

२. घटनेच्या वेळी मी अंगणात बसले होते असे मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले नाही. हे म्हणने खरे नाही की, मी पोलीसांना जबाब देतेवेळी असे सांगितले नाही की, 'साजीदच्या बायकोला फॅन घेवुन जायचा होता, साजीद फॅन घेवुन जाण्यास नकार देत होता'. साजीद फॅन घेवुन जाण्यास नकार देत होता, असे पोलीसांनी माझ्या जबाबात नमुद केले नाही. साजीदचे तोंड फुटले, असे पोलीसांनी माझ्या जबाबात नमुद केले नाही. पोलीसांनी तसे माझ्या जबाबात का नमुद केले नाही,

हे मी सांगु शकत नाही. हे म्हणने खरे आहे की, मी साजीदच्या परिवाराला चांगले ओळखते. घटना २६ तारखेची आहे. मला महीना आठवत नाही. घटनेच्या दिवशी पोलीस आले होते, त्यांनी माझ्याकडे दोन वेळा चौकशी केली. मी पोलीस स्टेशनला गेले नाही. दिनांक ०४.०५.२०२२ रोजी मी पोलीस स्टेशनला गेले नाही. फिर्यादीच्या पत्नीसोबत आलेल्या व्यक्तींची नावे मी पोलीसांना सांगितली नाही. हे म्हणने खरे आहे की, मला त्यांची नावे माहीत नव्हती. पोलीसांनी माझ्या जबाबात त्यांची नावे का नमुद केली हे मी सांगु शकत नाही. मी आज फिर्यादीसोबत कोर्टात आले. हे म्हणने खरे नाही की, मी अंगणात बसले होते त्यावेळी फिर्यादीची बायको आली आणि तीच्या सोबत आलेल्या व्यक्तींनी फिर्यादीसोबत मारपीट केली, त्यामुळे फिर्यादीचे नाक आणि तोंड फुटले, हे मी खोटे सांगते आहे. हे म्हणने खरे नाही की, त्यानंतर सगळे आरोपी साजीदच्या वडीलांच्या घरी गेले आणि तेथे त्यांनी तोडफोड केली, हे मी खोटे सांगते आहे. मला पोलीसांनी आरोपींना ओळखण्याकरीता बोलावले नव्हते. हे म्हणने खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण</u>**

**<u>फेरतपास काही नाही</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत | माझे समक्ष,

नागपूर<br>
दिनांकः–०८.०५.२०२४

(श्रीमती. एस.टी. दंडे)<br>
मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर